# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय**

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

**दूरध्वनी क्र.** : ०२२ - ६९८५ ३५१२ । **ई-मेल** : pro@mahagenco.in


क्र. : महानिर्मिती/का.सं. (सां.नि. व सु.)/जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/१०८ दिनांक : ०१/०४/२०२५.

**- वृत्तपत्रीय निवेदन -**

**उन्हाळयाच्या पार्श्वभूमीवर महानिर्मिती सज्ज**
**सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ६१,४५६ दशलक्ष युनिट्स विक्रमी वीजनिर्मिती**

**(मुंबई, दि. ०१/०४/२०२५) :** उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी वाढते, यासाठी दरवर्षी महानिर्मितीतर्फे सूक्ष्म नियोजन करण्यात येते. सद्य स्थितीत राज्याची विजेची एकूण मागणी २९,५०० मेगावॅटच्या घरात पोहोचली असून यासाठी महानिर्मिती सज्ज आहे.

महानिर्मितीने मार्च २०२५ मध्ये मासिक औष्णिक महत्तम ५,३२८ दशलक्ष युनिट्स इतके विक्रमी वीज उत्पादन केले तर उरण वायू वीज केंद्राने मागील ५ वर्षांतील सर्वात जास्त म्हणजे २,४७३ दशलक्ष युनिट्स वीज उत्पादन केले आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सन २०२४-२५ मध्ये निर्धारित केलेल्या लक्ष्यास अनुसरून महानिर्मितीच्या अपारंपारिक ऊर्जा, पुणे मंडळाने ४५४.४० दशलक्ष युनिट्स वीज उत्पादनाचे लक्ष्य गाठले आहे. एकूणच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ६१,४५६ दशलक्ष युनिट्स इतकी विक्रमी वीजनिर्मिती झाली असून सन २०२३-२४ चा ६१,४३९ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मितीचा विक्रम तोडला आहे, हे विशेष.

महानिर्मितीने सातत्याने उच्चतम कामगिरी नोंदवत अनेक उच्चांक गाठले आहेत. औष्णिक संचांची उपलब्धता, आवश्यक देखभाल-दुरुस्ती, भांडवली स्वरूपाची कामे याकडे विशेष भर दिल्याने यावर्षी महानिर्मितीच्या १५ संचांतून १०० दिवसांपेक्षा जास्त अखंडित वीज उत्पादन झालेले आहे.

प्रभावी इंधन व्यवस्थापनाची जोड दिल्याने वीज उत्पादनासाठी सुमारे २२.५ लक्ष मेट्रिक टन इतका कोळसा साठा सद्य परिस्थितीत उपलब्ध आहे आणि त्यामध्ये सातत्याने वाढ करण्यासाठी महानिर्मितीचा विविध स्तरावर पाठपुरावा विशेषतः कोळसा मंत्रालय, कोळसा कंपन्या आणि रेल्वे प्रशासनासोबत समन्वय सुरु आहे. यंदा वीज उत्पादनासाठी आवश्यक जल साठा संबंधित धरणांमध्ये पुरेसा उपलब्ध असल्याने आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील जनतेला आवश्यक मागणीनुसार अखंडित वीज उत्पादन करण्यासाठी महानिर्मिती प्रयत्नशील आहे.

राज्याचे मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांचे निर्देशानुसार महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, संचालक मंडळ आणि अधिकारी- तंत्रज्ञ-कर्मचारी राज्यातील जनतेला मागणीनुसार अखंडित वीज उत्पादन देण्यासाठी कटिबद्ध आहेत.

******